नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २५/०३/२०२५ ( मंगळवार ) सकाळ

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक २५/०३/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की मौजा जबलपुर नागपुर हायवे वर अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी आमडी फाटा येथे नाकाबंदी केली असता संशयीत वाहन टाटा कंपनीचा १२ चक्का ट्रक क्रमांक एम एच ३६ ए.ए. ४३२३ मिळुन आले. वाहन थांबवुन वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, **अजय राजेश बोरकर, वय २४ वर्षे , रा. सरांडी ता. तिरोडा जि. गोंदिया** अशी माहीती प्राप्त झाली त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. वाहन मालकाचे नाव **नितेश भगवान पारधी रा. डोंगरला ता. तुमसर जि. भंडारा** असे असल्याची माहीती प्राप्त झाली. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ६ ब्रास रेती किंमती ३०,०००/रूपये आणि २) १२ चक्का ट्रक क्रमांक एम एच ३६ ए.ए. ४३२३ किंमती ५०,००,०००/—रूपये असा एकुण **५०,३०,०००/—रूपया**चा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी वाहन चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे पारशिवणी येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४.२१. खान खनिज अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर